## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर-३३१२/२०२४

**अपिलार्थी, श्री.विठ्ठलराव श्रीपती यादव,**
**भूमिराज मनोर कॉ.ऑ.हौसो., लि, बी-१०१,**
**सेक्टर १४, पामबीच रोड, सानपाडा, नवी मुंबई ४०७०५.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा.वसाहत अधिकारी (साटयो), सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, सिडको भवन सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (१२.०५%) विभाग, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, सिडको भवन सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**व्दितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २८.१०.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.२.२०२४ | ---- | ३०.४.२०२४ | १०.६.२०२४ |

अपिलार्थी यांनी दि.५.९.२०२४ रोजीच्या अर्जान्वये "मागणी केलेली माहिती देण्यास टाळाटाळ" असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर व्दितीय अपिल अर्जात कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर व्दितीय अपिलावर आज दिनांक २८.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(१) भूमिराज मनोर कॉ.ऑ.सोसा.लि., प्लॉट क्र.३, सेक्टर १४, सानपाडा, नवी मुंबई ४००७०५ मानीव हस्तांतरण संबंधी केलेली कार्यवाही संबंधीची माहिती मिळणेबाबत.)"*

*"(१) भूमिराज मनोज सोसायटीच्या मानीव हस्तांतरण करणेसाठीच्या प्रस्तावावर सिडकोने आजपावेतो काय कार्यवाही केली त्यासंबंधीच्या पत्रव्यवहार संबंधीचे छायांकित प्रती. (२) सोसायटीचे मानीव हस्तांतरणाचा प्रस्ताव बरेच वर्ष प्रलंबित असण्याची कारणे.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, “जन माहिती अधिकारी तथा प्र. सहा. वसाहत अधिकारी (व्यवस्थापक शहर सेवा-२) यांनी अपिलकारास मागितलेली माहिती नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात यावी.” असा निर्णय देऊन अपिल निकाली काढले आहे.

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे व्दितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी दि.२४.१०.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास सुनावणीची पुढील तारीख मिळणेबाबत विनंती केली आहे. सबब, त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.४.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ ऑक्टोबर, २०२५

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

संगणक -10